# संपादकीय......

"**नवज्योत**" या त्रैमासिक संशोधन पत्रिकेच्या प्रकाशनाच्या प्रवासातील २०२३ या सरत्या वर्षातील डिसेंबर महिन्याचा अंक हा विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, अभ्यासक व वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे.

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाने जवळपास संपूर्ण जगानेच टाळेबंदीचा अनुभव घेतला आहे. जगाला महामारीच्या धसक्यातून वाचविण्यासाठी शास्त्रज्ञ, तज्ज्ञ, संशोधक हे रात्रंदिवस त्यावरील लस, औषधे व मानसोपचार शोधण्यात गुंतले होते. परंतु अजूनही कोव्हिड-१९ च्या महामारीचा धोका काही संपलेला नाही. आजही भारतासह जवळपास सर्वच देशांमध्ये कोव्हिड-१९ हा नवनवीन व्हेरियंटच्या रूपामध्ये लोकांना ग्रासतो आहे. हे संकट कमी की काय म्हणून रशिया-युक्रेन युद्ध, इस्त्रायल-हमास युद्ध अशा संकटांनी सध्या जगाला ग्रासले आहे. महामारी व युद्धांमुळे आज जवळपास सर्वच देशांच्या अर्थव्यवस्था पार मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे समाजातील अगदी लहानांपासून-थोरांपर्यंत सर्वांचीच परिस्थिती विमनस्क अवस्था झालेली आहे. राज्य व समाज व्यवस्थेची घडी आणि व्यक्तीची मनोअवस्था नीट होण्यासाठी नवनिर्माण, नवोन्मेषी सिद्धांत निर्मितीची नितांत गरज आहे. या कार्यासाठी शास्त्रशुद्ध संशोधनाद्वारे समस्यांचे निराकरण करण्याची आवश्यकता असते. संशोधनाच्या माध्यमातून राष्ट्रसंताचे विचार, राष्ट्रवादासंबंधीचे विचार व त्याचबरोबर सामाजिक चळवळींमधून होणारे प्रबोधन व त्यांचे वैचारिक आधार एका परिपक्व लोकशाहीसाठी आवश्यक आहेत. खऱ्या व परिपक्व लोकशाही समाजासाठी निष्पक्ष व पारदर्शी निवडणूका हा लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय बनण्याची आवश्यकता आहे. असे संशोधन व लिखाण करण्याची खरी जबाबदारी ही विशेषतत्वाने सामाजिक शास्त्रे व मानव्यविद्या शाखांची आहे. कोव्हिड-१९ ची जागतिक महामारी व रशिया-युक्रेन युद्ध, इस्त्रायल-हमास युद्धाच्या पार्श्वभूमीवर 'नवज्योत' चा अंक प्रकाशित होत आहे. खरेतर आर्थिक व मानसिक घडी पूर्णपणे विस्कटल्याच्या या काळात ती घडी नीट किंबहुना पूर्ववत तरी करण्याची महत्वाची जबाबदारी संशोधनकर्त्या लेखकांवर येवून पडते. प्रस्तुत 'नवज्योत' या अंकाचे वैशिट्य म्हणजे समाजाच्या वर्तमान समस्या व प्रश्नांवर ऐतिहासिक आणि समकालीन वस्तुनिष्ठ तथ्यांवर व शास्त्रीय पद्धतींवर आधारीत केलेले लिखाण होय. शोधकर्त्या लेखकांनी आपल्या शोधकार्यात विभिन्न विषय हाताळले असून आपल्या विषयाची मांडणी वस्तुनिष्ठपणे तथ्यावर केलेली दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने 'Effect of Continuous Running on Endurance of Men Kabaddi Players' या लेखामध्ये श्याम दळवी पुरुष कबड्डी खेळाडूंच्या सततच्या धावण्याचा होणाऱ्या परिणामासंदर्भात आलेली मांडणी खेळाडूंच्या प्रश्नांबाबत शोधकर्ते, लेखकांसह वाचकांच्या भावविश्वाला हात घालणारी आहे. 'अवलंबन आणि परस्पपरावलंबन सिद्धांताची व्यवहार्यता' या लेखामध्ये अवलंबन आणि परस्पपरावलंबन सिद्धांताचे महत्त्व व त्याची व्यवहार्यता याबाबत केलेले विवेचन हे अभ्यासकांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. याशिवाय राष्ट्रसंताचे विचार, राष्ट्रवादासंबंधीचे विचार व त्याचबरोबर सामाजिक चळवळींमधून होणारे प्रबोधन व त्यांचे वैचारिक आधार ते भारताचे परराष्ट्र धोरण व त्यापुढील आव्हानांची आणि त्या आव्हानांचे व्यवस्थापन आदि विषयांवर झालेले मांडणी अभ्यासकांना विचारप्रवण करणारी आहे. अशा महत्त्वपूर्ण अंकाचे संपादकीय लिहिण्याबाबतचा विश्वास प्रकाशक, संस्थापक डॉ. रवींद्र भणगे, प्राध्यापक राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दर्शविल्याने मी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

२०२३ च्या सरत्या वर्षातील हा अंक तितकाच महत्त्वपूर्ण आणि संशोधन विषयाची बाजू उंच करणार आहे. आंतरविद्याशाखीय व बहुभाषिक शोध पत्रिका असल्याने प्रस्तुत अंकात आलेले संशोधन लिखाण विविध शाखांशी आणि विषय पैलूंशी निगडित आहे. अत्यंत विषम परिस्थितीत सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवण्याचे कार्य संशोधन प्रकाशन करीत आहे. त्यात निश्चितच संशोधन लेखन करणा-यांचा वाटा मोठा आहे. प्रस्तुत अंकातील सर्व लेखांमधूनच समाजातील समकालीन समस्या व प्रश्नांशी निगडीत अनेक महत्वपूर्ण विषयावर शोधपूर्ण मांडणी झालेली आहे. 'नवज्योत' च्या अखंड व अविरतपणे चालणाऱ्या शोधकार्यास केवळ आपल्या मौलिक योगदानामुळेच अर्थपूर्ण सातत्य प्राप्त होत आले आहे.

आपले मनस्वी धन्यवाद.....

**डॉ. सुखदेव उंदरे**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.